**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

दत्तात्रय मोहन पेठकर
११५२ अ, विष्णू गल्ली,
तासगांव, जि. सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक,
सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,
शहर विभाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१९ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१/१०/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/१२/२००८ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** कुपवाड येथील माझ्या मालकीच्या वडिलापार्जित जमिनीची सर्व कागदपत्रे अवलोकनास मिळावी, तसेच दि. २५/१०/२००८ रोजी केलेल अर्जासोबतची सर्व कागदपत्रे मिळावी. | |

**विवेचन**

अपीलकर्ता, श्री.दत्तात्रय मोहन पेठकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाच्या संदर्भाने मूळ अर्जानुसार सर्व कागदपत्रांच्या प्रती प्राप्त झाल्या असल्याने अपील निकाली काढण्याबाबत दि. १०/४/२००९ च्या पत्रान्वये कळविले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८-१०-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ.विजय दशरथ जाधव
४३६, शुक्रवार पेठ, पुणे-२

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्यप्रमुख,
पुणे महानगरपालिका

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्यप्रमुख,
पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.विजय दशरथ जाधव
४३६, शुक्रवार पेठ, पुणे-२

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्यप्रमुख,
पुणे महानगरपालिका डॉ.प्र.शं.धायगुडे

**जन माहिती अधिकारी** तथा उपआरोग्यप्रमुख,
पुणे महानगरपालिका प्रतिनिधी डॉ.प्र.शं.धायगुडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.६.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी, मेडिकल सुपरिंटेंडेंट, असिस्टंट मेडिकल सुपरिंटेंडेंट यांची ड्यूटी लिस्ट मिळावी. असिस्टंट मेडिकल सुपरिंटेंडेंट हे पद १९६६ पूर्वीपासून आहे.त्यावेळी त्या पदाची असणारी ड्यूटी लिस्ट व १९९८ नंतर त्या लिस्टमध्ये काही फरक केला आहे का, असल्यास पत. | |

## विवेचन

पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरु रुग्णालयातील असिस्टंट मेडिकल सुपरिंटेंडेंट या पदाची कर्तव्ये व निवासी वैद्यकीय भत्ता याची माहिती आपण मागितली होती. डयूटी लिस्ट मिळाली नाही व बाकीची माहिती अपुरी दिली. आर्थिक भत्ते बंद करण्याचे अधिकार कोणाला आहेत, आरोग्य प्रमुखांना ते आहेत काय, अशा आपल्या १८ पैकी निम्म्या प्रश्नांना उत्तरे मिळाली नाहीत, असे प्रतिपादन अपीलकर्ता डॉ.विजय दशरथ जाधव यांनी केले. पाचव्या वेतन आयोगातील काही भत्ते आपल्याला पूर्वकल्पना न देता बंद करण्यात आल्याची तक्रार त्यांनी केली.

आरोग्य कार्यालयाने डॉ.विजय दशरथ जाधव यांना दिलेली माहिती अपुरी असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहआयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले. तसेच असिस्टंट मेडिकल सुपरिंटेंडेंट या पदाला निवासी वैद्यकीय भत्ता देण्याचे आदेश पारित झालेले असल्यामुळे डॉ.जाधव यांची तक्रार असण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा आरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका यांनी त्याचाच पुनरुच्चार केला.

डॉ.जाधव यांना अपेक्षित असलेली ऊर्वरित स्पष्टीकरणात्मक माहिती दोन दिवसात देऊन आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. असा अहवाल सादर न करण्यात आल्यामुळे आयोगाने जन माहिती अधिकारी तथा उपआरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका यांचा खुलासा मागविला. सुनावणीला उपस्थित असलेले तत्कालीन आरोग्यप्रमुख यांच्याकडून आयोगाच्या आदेशाबाबत आपल्याला कळविले गेले नाही, त्यामुळे अनुपालन अहवाल सादर केला गेला नाही. डॉ.जाधव यांना सर्व माहिती देण्यात आली असून आपली तक्रार राहिली नसल्याचे त्यांनी समक्ष तोंडी सांगितले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उपआरोग्यप्रमुख, पुणे महानगरपालिका डॉ.ध.दि.चांदककर यांनी दि.२५.९.२००९ च्या पत्राद्वारे आयोगास कळविले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१ .१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. प्रभाकर धोंडीबा कवडे
रा.सर्व्हे नं. २८३, शिर्केनगर, मुंढवा, पुणे-३६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त
(विशेष), पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
(भूमि प्रापण ), पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.८.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष), पुणे महानगरपालिका, पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. के.सी.कारकर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, (भूमि प्रापण ), पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सु.ए. देसाई | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.५.२००६ |
| ८ | **माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे.** | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७.८.२००८ रोजी घेतलेल्या सुनावणीस अपीलकर्ता श्री. प्रभाकर धोंडीबा कवडे गैरहजर होते.

मौजे घोरपडीगाव येथील रस्त्यासाठी संपादित केलेली जमीन सन १९८६ साली निवाडा होऊन व नुकसान भरपाई देऊनही १६ वर्षे पाठपुरावा करुनदेखील संबंधित जमीनमालकाकडून ताबा घेतला जात नाही व रस्ता केला जात नाही. या जागेवर अतिक्रमण झाले आहे, या संदर्भात आपण मागितलेली माहिती चुकीची व अपूर्ण दिली जाते, असे प्रतिपादन श्री. कवडे यांनी लेखी निवेदनात केले आहे.

श्री. कवडे सातत्याने हा विषय मांडत असून निवाड्याकामी झालेल्या मोजणी नकाशाच्या प्रतीसह सर्व माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आली आहे. जागेवर अतिक्रमण नसल्याचे खात्याने कळविले आहे, परंतु श्री. कवडे यांच्या म्हणण्याप्रमाणे संबंधित जागेची पाहणी करुन अतिक्रमण असल्यास ते काढण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयात दिले होते. माहिती चुकीच्या असल्याच्या श्री. कवडे यांच्या सर्व मुद्दयांबाबतही त्यांना स्पष्टीकरण देण्यात आले आहे. अन्य बाबी प्रशासकीय कार्यवाहीच्या आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (भूमि प्रापण), पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सु.ए. देसाई व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष), पुणे यांचे प्रतिनिधी श्री. के.सी. कारकर, उपआयुक्त (भूसंपादन -भूमिप्रापण ), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. भरत बाळासाहेब विटकर
स.नं.१२६, विठाई निवास, आकाश नगर, वारजे, पुणे-५२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपसंचालक,
नगर रचना, पुणे विभाग,पुणे, स.नं. ७४/२, सहकारनगर, सारंग सोसायटी,
बँक ऑफ महाराष्ट्र, १ ला मजला, पुणे ४११ ००९ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर रचनाकार
नगर रचना, पुणे विभाग,पुणे, स.नं. ७४/२, सहकारनगर, सारंग सोसायटी,
बँक ऑफ महाराष्ट्र, १ ला मजला, पुणे ४११ ००९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७५/२००९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. भरत बाळासाहेब विटकर
स.नं.१२६, विठाई निवास, आकाश नगर, वारजे, पुणे-५२

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपसंचालक,
नगर रचना, पुणे विभाग,पुणे, स.नं. ७४/२, सहकारनगर, सारंग सोसायटी,
बँक ऑफ महाराष्ट्र १ ला मजला, पुणे ४११ ००९ श्रीमती साधना नाईक

**जन माहिती अधिकारी** तथा नगर रचनाकार, नगर रचना, पुणे विभाग,पुणे,
स.नं. ७४/२, सहकारनगर, सारंग सोसायटी, बँक ऑफ महाराष्ट्र , १ ला मजला, पुणे
श्रीमती मा.प्र.चौगुले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०९.०३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०८.०४.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.०४.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.०५.२००९ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>नगररचना व मूल्यनिर्धारण विभागाने दिलेल्या जाहिरातीनुसार अनुरेखक व इतर पदांसाठी सरळ सेवा भरतीमध्ये खेळाडू व इतर आरक्षणात लेखी व व्यावसायिक परीक्षेत उत्तीर्ण होऊन नियुक्ती झालेल्या उमेदवारांची नावे व पत्ते, खेळाडू आरक्षणासाठी कोणती भरती प्रक्रिया अवलंबिण्यात आली इ.अनुषंगिक ९ मुद्दे | |

## विवेचन

खेळाडूंसाठी असलेल्या आरक्षणास आपण पात्र असूनही आपली निवड झालेली नाही, अशी अपीलकर्ता श्री.भरत बाळासाहेब विटकर यांची तक्रार आहे. त्या अनुषंगाने आपल्याला दिलेल्या माहितीतील आधारभूत शासन निर्णय कोणता व खेळाडूंसाठी असलेले नेमके आरक्षण हे स्पष्टपणे समजून येत नाही, असे निवेदन श्री.विटकर यांनी केले.

श्री.विटकर यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली आहे. पूरक अशी काही अतिरिक्त माहिती त्यांना निःशुल्क पुरविण्याचे आदेश प्रथम अपिलावरील निर्णयात दिले होते. ती माहितीही त्यांना देण्यात आली. आयोगाकडे केलेल्या अपिलात त्यांच्या मूळ अर्जाव्यतिरिक्त आणखी काही माहिती त्यांनी मागितली आहे. या संदर्भात सर्व संचिकांची पाहणी करून आणखी काही माहिती हवी असल्यास ते घेऊ शकतील, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, उपसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय श्रीमती मा.प्र.चौगुले व अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे श्रीमती साधना नाईक यांनी केले. खेळाडू या समांतर आरक्षणांतर्गत नियुक्ती न दिल्यामुळे श्री.विटकर यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये याचिका दाखल केली आहे. त्या दाव्यात उपसंचालक, नगररचना

कार्यालयाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत श्री.विटकर यांना प्राप्त झाली असून त्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांचे खुलासे त्यात आहेत, असेही श्रीमती नाईक यांनी पूरक कागदपत्रांसह लेखी व तोंडी नमूद केले.

श्री.विटकर यांची नियुक्तीबाबतची तक्रार व मागणी याचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२७.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र एकनाथ दणके
३९५, दैनिक लोकटाईम्स, मंगळवार पेठ, पुणे-११ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे-११ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक अभियंता,
कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे-११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०१ / पुणे / [illegible] |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेंद्र एकनाथ दणके
३९५, दैनिक लोकटाईम्स, मंगळवार पेठ, पुणे-११

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे-११ श्री.रा.रा.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक अभियंता,
कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे-११ श्री.अ.रा.केंदळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कुकडी प्रकल्प मंडळातील धरण, कालवे इत्यादि कामांची व त्या अनुषंगाने ठेकेदार आदींबाबतची आपण मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची आहे व त्या त्या विभागाकडे अर्ज करून माहिती घ्यावी, असे जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे-११ यांनी आपल्याला कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांनीही या मागणीची दखल घेतली नाही व अयोग्य निर्णय दिला, सर्व माहिती एकाच मंडळाच्या कक्षेतील असल्यामुळे एकत्रित स्वरूपात जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता यांनीच दिली पाहिजे. असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.राजेंद्र एकनाथ दणके यांनी केले.

श्री.दणके यांनी तीन वर्षांच्या काळातील व कुकडी प्रकल्प मंडळाअंतर्गत पाच विभागांकडील विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. विभागीय कार्यालयांशी संबंधित अशी ही माहिती असून प्रत्येक विभागाला स्वतंत्र जन माहिती अधिकारी आहेत. त्यामुळे श्री.दणके यांनी त्यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करून माहिती घ्यावी, असे त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यापासून चार दिवसांत जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. त्यांनी मागितलेली माहिती सरसकट स्वरूपाची असून एकत्रित उपलब्ध नाही. मंडळाने ती संकलित करून उपलब्ध करून द्यावी अशी त्यांची अपेक्षा आहे. परंतु विभागीय स्तरावरून त्यांनी ती घेणे आवश्यक असल्यामुळे तसा निर्णय प्रथम अपिलावर दिला, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे-११ श्री.रा.रा.पवार यांनी केले.

संबंधित विभागांच्या जन माहिती अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा अथवा माहितीचे नेमके स्वरूप स्पष्ट करण्यासाठी विभागीय कार्यालयात उपलब्ध धारिकांची समक्ष पाहणी करून हव्या असलेल्या कागदपत्रांची मागणी केल्यास व त्याचे पैसे भरल्यास त्यांना लगेचच छायाप्रती काढून देण्यात येतील, असेही श्री.दणके यांना आपण दि.१५.१२.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केलेल्या निवेदनाची प्रत पाठवून पुन्हा कळविले होते. आवश्यक माहितीबद्दल नेमकेपणाने श्री.दणके यांनी कळविलेले नाही, तसेच प्रत्येक विभागाकडे स्वतंत्र अर्ज अथवा अभिलेख अवलोकन यासाठीही त्यांनी नंतर संपर्क साधलेला नाही, असेही श्री.पवार यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी आपला अर्ज संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडे पाच दिवसांत वर्ग करावयास हवा होता, असा मुद्दा श्री.दणके यांनी मांडला. परंतु एखाद्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे / सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज वर्ग करणे शक्य व आवश्यक आहे, मात्र त्याहून अधिक जन माहिती अधिकऱ्यांकडे / सार्वजनिक प्राधिकरणांकडे अर्जाच्या प्रती पाठविण्याची अपेक्षा जन माहिती अधिकाऱ्यांकडून करता येणार नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती नाकारलेली नाही. त्यांनी सुचविलेल्या पर्यायातून योग्य पर्याय स्वीकारुन अपीलकर्ता माहिती प्राप्त करून घेऊ शकतात.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २७ .१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळासाहेब रघुनाथ पोकळे
स.नं.१२०, जय भवानी, कोथरूड, पुणे-३८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. बाळासाहेब रघुनाथ पोकळे
स.नं.१२०, जय भवानी, कोथरूड, पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे श्री. सी. एम. खरटमल

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे श्री. अमर आ. पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.९.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>रिक्षा क्र.एम.एच.१२-अआर-२७४१ च्या परवाना नुतनीकरणाबाबत व श्री. मदनला परतानी फायनान्सचा बोजा कसा नोंदवला याबाबतची माहिती |

## विवेचन

आपल्या रिक्षा परवान्यावर कर्जाचा बोजा कसा चढविला गेला व परवान्याचे नूतनीकरण परस्पर कोणी केले, याबद्दलच्या तक्रारीची दखल घेतली नाही व त्याबद्दलची माहितीही दिली नाही, म्हणून जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. बाळासाहेब रघुनाथ पोकळे यांनी केली.

श्री. पोकळे व अन्य व्यक्ती यांच्यातील अंतर्गत वादाचा हा विषय असून त्यांनी विचारलेली सर्व माहिती बँकेच्या पत्रासह त्यांना वेळोवेळी देण्यात आली आहे. प्रथम अपिलाची योग्य दखल घेतली गेली नाही, हे त्यांचे म्हणणे योग्य नाही. सुनावणीसाठी दोन वेळा त्यांना पाठविलेली पत्रे परत आली. भ्रमणध्वनीवरुन सुनावणीबाबत त्यांना कळवूनही ते हजर राहिले नाहीत, म्हणून अपील निकाली काढले, असे जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे श्री. अमर आ. पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे श्री. सी.एम. खरटमल यांनी नमूद केले.

परवान्याच्या नूतनीकरणाविषयी व बोजा नोंदीविषयी प्रादेशिक परिवहन अधिकारी व श्री. मदनलाल गंगालाल परतानी यांनी योग्य निर्णय घेतला नाही, तर फसवणूक केल्याबद्दल फौजदारी कारवाई आपण करणार आहोत. या फसवणुकीची दखल आयोगाने घ्यावी, असे प्रतिपादन श्री. पोकळे यांनी लेखी व तोंडी केले. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच संबंधित सर्व माहिती त्यांना विहित मुदतीत देण्यात आली आहे, असे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते.

श्री. पोकळे यांना पाठविलेल्या पत्रांच्या जावक बारनिशीतील छायांकित प्रती आयोगाला सादर कराव्या व श्री. पोकळे यांना माहिती द्यावयाची राहिली असल्यास निःशुल्क द्यावी, असे

मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे श्री. सी.एम.खरटमल यांनी दि.१८.२.२००९ च्या पत्रान्वये जावक नोंदीच्या प्रती सादर केल्या.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.अरूण महादेव महाजन
स.न.१३५, यशोदीप सोसायटी, वारजे माळवाडी, पुणे ४११ ०५२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** व्यवस्थापकीय संचालक,
पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे
कुबेरा चेंबर्स, संचेती हॉस्पिटलसमोर, शिवाजीनगर, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** माहिती अधिकारी,
पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे
कुबेरा चेंबर्स, संचेती हॉस्पिटलसमोर, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अरूण महादेव महाजन
स.न.१३५, यशोदीप सोसायटी, वारजे माळवाडी, पुणे ४११ ०५२

**अपिलीय प्राधिकारी तथा** व्यवस्थापकीय संचालक,
पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे
कुबेरा चेंबर्स, संचेती हॉस्पिटलसमोर, शिवाजीनगर, पुणे-५ श्री.शिरीष कारले

**जन माहिती अधिकारी तथा** माहिती अधिकारी,
पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे
कुबेरा चेंबर्स, संचेती हॉस्पिटलसमोर, शिवाजीनगर, पुणे-५ श्री.नितीन धोत्रे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.०५.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.०६.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.०६.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०८.०८.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** श्री.एन.सी.धोत्रे यांना संपूर्ण सेवा कालावधीत देण्यात आलेल्या पदोन्नती, त्यासाठी सादर करण्यात आलेल्या कार्यालयीन टिप्पणीच्या प्रती शिफारस व मंजुरीच्या तपशीलासह, या पदोन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या अटी, अर्हता इत्यादी अनुषंगिक एकूण १३ मुद्दे | |

## विवेचन

पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाच्या श्री.नितीन धोत्रे यांच्यासह पाच कर्मचाऱ्यांबद्दलची, तसेच स्वतःच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने माहिती मागणारे दोन अर्ज अपीलकर्ता श्री.अरुण महादेव महाजन यांनी केले होते. राज्य माहिती आयोगाने दि.१७.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त माहिती देण्यासाठी मुदत मागितली, परंतु आपल्याला अद्याप संपूर्ण माहिती दिली गेलेली नाही. श्री.धोत्रे यांना दिलेल्या पदोन्नतीबाबतच्या अटी, पात्रता आदी माहिती मिळाली नाही. श्री.के.टी.बोर्डे यांच्या काळात फ्रँकिंगमध्ये झालेल्या चुकांमुळे झालेला महामंडळाचा तोटा, श्री.पी.जे.साठे यांना दिलेली पदोन्नती आदींबाबतची माहिती दिलेली नाही, असे प्रतिपादन श्री.महाजन यांनी केले. तसेच महामंडळाकडे जन माहिती अधिकारी पद अद्याप नसल्याचा

आक्षेपही त्यांनी नोंदविला. पदोन्नतीबाबतची प्रक्रिया योग्य पध्दतीने पाळली गेलेली नाही. आपण व श्री.साठे पदोन्नतीला सारखेच पात्र असताना श्री.साठे यांना पदोन्नती दिली व आपल्याला दिली नाही, असेही त्यांनी नमूद केले.

याच संदर्भातील सन १९७३ ते १९८५ या काळातील माहिती श्री.महाजन वेळोवेळी मागत आले आहेत. उपलब्ध असलेली माहिती त्या त्या वेळी त्यांना दिली आहे. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात मागितलेली मुदत ही अपिलात त्यांनी उपस्थित केलेल्या अतिरिक्त मुद्दयांच्या उत्तरासाठीची होती. त्यानुसार त्यांना उत्तर दिले. 'गोपनीय' म्हणून आधी न दिलेल्या टिपण्यांच्या प्रतीही दिल्या. त्यावेळी असणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांनी शर्ती व पात्रता यांचा विचार करुनच पदोन्नती दिलेली आहे. त्याबाबतचा अभिप्राय आता देता येणार नाही. श्री.बोर्डे यांच्या काळातील फ्रँक्रिंगच्या संदर्भातील माहितीही देण्यात आली आहे. श्री.साठे यांच्या संदर्भातील सन १९९४ मधील संचिका शोध घेऊनही मिळाली नाही. मात्र स्वत:ला पदोन्नती न मिळाल्यामुळे आकसातून व्यक्तिगत कारणावरुन श्री.महाजन अशा स्वरुपाचे अर्ज सातत्याने करीत आले आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे श्री.नितीन धोत्रे व अपिलीय प्राधिकारी, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे श्री.शिरीष कारले यांनी नमूद केले. महामंडळामध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी नियुक्त असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महामंडळामध्ये अभिलेखांची वर्गवारी करण्यात आलेली नाही, त्यामुळे जतनाचा कालावधी लक्षात घेऊन पुढील कारवाई करता येत नाही. सध्या वर्गवारीचे काम चालू असून येत्या दोन महिन्यात ते पूर्ण होईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे श्री.शिरीष कारले यांनी सांगितले.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.महाजन यांना माहिती देण्यात आली आहे. स्वत:ला पदोन्नती का मिळाली नाही, अशासारखी त्यांची विचारणा ही माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही. श्री.महाजन आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करु शकतील. जन माहिती अधिकारी श्री.नितीन धोत्रे यांनी अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावेत. मात्र व्यक्तिगत वादासाठी व प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीकरिता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सातत्याने अर्ज व अपिले करणे हा या कायद्याचा योग्य वापर नाही, अशी समज अपीलकर्ता यांना देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२ .१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर** (५८)
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.तुषार बाळासाहेब शिवले
नेताजी चौक, सासवड,
ता.पुरंदर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
पुणे उपविभाग, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१६/२००९/ पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.६.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.७.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.७.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>आरटीएस/अपील/३५/६३ च्या आदेशाची प्रत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. तुषार बाळासाहेब शिवले यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,उपविभागीय अधिकारी कार्यालय, पुणे उपविभाग, पुणे यांनी कळविल्यानुसार अपीलकर्ता श्री.शिवले यांनी त्यांना हव्या असलेल्या अपील आदेशाचा दिनांक जन माहिती अधिकारी यांना कळवून आवश्यक त्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २३ / १०/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.सारंग वसंत लोणकर
२०/५, आनंदनगर, पौड रोड,
कोथरुड, पुणे-२९ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,
पुणे महानगरपालिका, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१८+१४१५+१४१६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.०७.२००८ व दि.२८.०८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.सारंग वसंत लोणकर
२०/५, आनंदनगर, पौड रोड,
कोथरुड, पुणे-२९

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.मदन रामचंद्र आढारी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. प्रविण वामन गेडाम

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १२१८ | ०४.०७.२००७ | २२.०८.२००७ | १६.०८.२००७ | ०६.०९.२००७ |
| १४१५ | २१.०८.२००७ | - | ०१.१०.२००७ | २२.१०.२००७ |
| १४१६ | २७.०८.२००७ | - | २९.०९.२००७ | २२.१०.२००७ |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**

अपील क्रमांक १२१८, १४१५ व १४१६ - सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

आपल्या मालकीच्या भूखंडामधून रस्ता जाऊ शकत नसताना बेकायदेशीरपणे रस्ता दर्शविला जात आहे. सन २००४ मध्ये गुंठेवारी केली तेव्हा या भूखंडामधून रस्ता जात नसल्याचे आपल्याला लेखी दिलेले आहे. नंतर त्यातून रस्ता जाईल असे कळविले व नंतर पुन्हा अंतर कमी करुन दिले. विकास आराखड्याप्रमाणे रस्त्यांची आखणी झालेली नाही व गुंठेवारी खोटी असूनही ती रद्द केली जात नाही, अशी श्री.सारंग वसंत लोणकर यांची तक्रार असून त्यानुषंगाने विविध स्वरुपाचा पत्रव्यवहार, अर्ज व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज व अपिले ते करीत आले आहेत. याच संदर्भातील तीन अर्जांबाबत जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,पुणे महानगरपालिका, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता,बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या पातळीवरुन योग्य माहिती दिली जात नाही, व कार्यवाही केली जात नाही, या कारणांवरुन श्री.लोणकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१६.०७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. आपण मागितलेल्या माहितीबाबत प्रत्येक वेळी दिशाभूल करणारी उत्तरे दिली जात आहेत. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेल्या मूळ विकास आराखड्यापेक्षा वेगळा आराखडा नंतर दर्शविण्यात येत आहे. नागरिकांना अंधारात ठेवून महापालिकेतील हितसंबंधी व्यक्तीने राज्य सरकारकडून त्याला मान्यता घेतली आहे. महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांसाठी पुणे शहराच्या विकास

आराखड्यात असा अनधिकृत बदल केला आहे. आपला भूखंड त्यात बाधित होतो. त्याबाबतचे पुरावे आपण अधिकाऱ्यांना वेळोवेळी सादर केले आहेत, असे प्रतिपादन श्री.लोणकर यांनी लेखी व तोंडी केले.

श्री.लोणकर यांच्या मागणीप्रमाणे त्यांनी दर्शविलेल्या हद्दीनुसार प्रत्यक्ष जागेवर जाऊन झोनिंग करुन दिलेले आहे. प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती व प्रारुप विकास आराखडा यांची पडताळणी करुन डीपी अभिप्राय देण्यात आला. त्यानंतर रस्ता आखण्यात येऊन त्यानुसार दुरुस्त अभिप्राय देण्यात आला. गुंठेवारीच्या वेळी विकास आराखडा पूर्ण देण्यात आला नव्हता. गुंठेवारी भूमी अभिलेख खात्याकडे गुंठेवारी अभिप्रायासाठी पाठविली होती. त्यामध्ये भूमी अभिलेख खात्याने दिलेल्या अभिप्रायाची माहिती श्री.लोणकर यांना देण्यात आली. तसेच त्यांना संबधित प्रकरणाची सर्व कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रविण वामन गेडाम व अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता,बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,पुणे महानगरपालिका, पुणे श्री.मदन रामचंद्र आढारी यांनी केले.

आपल्याला खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली जात आहे. विकास अभियंता यांनी सुनावणी दरम्यान आयोगापुढे ठेवलेल्या गुंठेवारीविषयक संचिकेत डीपी अभिप्रायामध्ये शाईने केलेल्या दुरुस्त्यांवर मान्यतादर्शक अशी आपली किंवा आपल्या आर्किटेक्टची सही नाही, असे निवेदन श्री.लोणकर यांनी केले, तर श्री.लोणकर यांनी गुंठेवारीसाठीचे चुकीचे अंतिम नकाशे सादर केले. आपला भूखंड बाधित होऊ नये या हेतूने भूखंडाची जागा चुकीची दर्शविली आहे, अशा स्वरुपाचे आक्षेप जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रविण वामन गेडाम व अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता,बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,पुणे महानगरपालिका, पुणे श्री.मदन रामचंद्र आढारी यांनी कागदपत्रांमध्ये नोंदविले आहेत.

उभय बाजूंमध्ये विकास आराखडा, डीपी अभिप्राय आदींबाबत असलेले मतभेद हा कायदेशीर तपासणीचा भाग आहे. या अनुषंगाने माहिती योग्य की अयोग्य, याबद्दल दावे परस्परविरोधी उभय बाजूंनी केले आहेत. या स्थितीत अभिलेखानुसार असणारी माहिती दिली की

नाही, याचाच निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये होऊ शकतो. नोंदी कायदेशीर की बेकायदेशीर, याचा निर्णय या कायद्यान्वये करता येणार नाही.

श्री.लोणकर यांनी मूळ अर्जात मागितलेली माहिती व त्या अनुषंगाने नंतरच्या अपिलांमध्ये नवे मुद्दे व अधिक स्पष्टीकरणं आदींची मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये अपेक्षित असलेल्या विहित प्रक्रियेनुसार ते योग्य नाही. मात्र श्री.लोणकर यांच्या मूळ अर्जानुसार प्रत्येक मुद्दयांचे नेमके उत्तर जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,पुणे महानगरपालिका, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता,बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,पुणे महानगरपालिका, पुणे यांनी आठ दिवसात द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,पुणे महानगरपालिका, पुणे श्री.मदन रामचंद्र आढारी यांनी दि.०४.०९.२००८ च्या पत्रान्वये श्री.लोणकर यांना पाठविलेल्या उत्तराची प्रत आयोगाला सादर केली. परंतु आपल्या भूखंडाची नकाशातील जागा चुकीची दर्शविलेली आहे, इ.मुद्दे नमूद करुन श्री.लोणकर यांनी उत्तराबाबत विविध आक्षेप नोंदविणारी निवेदने आयोगाला सादर केली. याबाबत आयोगाने खुलासा मागविला असता, संबंधित खात्यांकडून सर्व माहिती दिली असल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना क्र.२,पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रविण वामन गेडाम यांनी दि.२५.०९.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : १५/ १०/२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.शिवाजी मारुतीराव घुले
मधुबन, वाडा रोड, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे ४१० ५०५ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपविभागीय कृषी अधिकारी,
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका कृषी अधिकारी,
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३४+१२३५/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |
| **३.** | **उपस्थित** | |
| **अपीलकर्ता अपिलीय प्राधिकारी तथा** उपविभागीय कृषी अधिकारी, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे श्री.सी.एस.भोर<br>**जन माहिती अधिकारी तथा** तालुका कृषी अधिकारी, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे श्री.एच.जे.शिंदे | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.०६.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.०८.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.०७.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.०९.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>तालुका कृषी अधिकारी, खेड यांनी दि.०१.०१.२००४ ते ३१.०३.२००७ या कालावधीतील तपासणी केलेल्या गटांची व खर्चाची माहिती मिळणेबाबत | |

**विवेचन**

दि.१७.७.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता उपस्थित नव्हते. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

तालुका कृषी अधिकारी, राजगुरुनगर श्री.व्ही.एन.देशमुख यांच्याकडे दि.२५.६.२००७ रोजी आपण माहिती मागणीचा अर्ज केला. त्यांनी तपासणी केलेल्या कामांच्या मजूर केणी अहवालाच्या प्रती आपण मागितल्या होत्या, तेच जन माहिती अधिकारी होते. परंतु दि.१५.७.२००८ पर्यंत आपल्याला कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही अथवा त्या संबंधित खुलासाही केला नाही. दि.१७.७.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी माहिती साक्षांकित करुन देण्यात आली. अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शिवाजी मारोतीराव घुले यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या दोन अपिलांमध्ये केलेली आहे.

श्री.घुले तालुका कृषी अधिकारी, राजगुरुनगर यांच्या अधिनस्त, मंडळ कृषी अधिकारी, चाकण यांच्या कार्यालयात अनुरेखक या पदावर काम करीत आहेत. श्री.देशमुख यांनी अभिलेखाचे अवलोकन करण्यासाठी त्यांना पत्र पाठविले. परंतु एक महिन्याच्या मुदतीपूर्वीच त्यांनी तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, राजगुरुनगर यांच्याकडे अपील केले व ते अभिलेख अवलोकनासाठी आले नाहीत. त्यांना अभिलेखाचे अवलोकन करु द्यावे व शुल्क आकारुन माहिती द्यावी असे कळविले. त्यानुसार दि.६.८.२००७ रोजी त्यांना पुन्हा पत्र पाठविले, परंतु ते आले नाहीत व त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. तसे लेखी निवेदन श्री.देशमुख यांनी आयोगाला पूरक कागदपत्रांसह सादर केले. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा-- व अपिलीय प्राधिकारी तथा-- यांनी त्याबाबतचा तपशील नमूद केला. श्री.घुले यांनी छायांकित प्रती मागितल्या होत्या. प्रथम अपिलातील आदेशानुसार त्या देण्यात आल्या. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी त्यांच्या मागणीनुसार साक्षांकित प्रती देण्यात आल्या. कार्यालयात ज्या स्वरुपात ही माहिती ठेवली जाते, त्या स्वरुपात संपूर्ण माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन श्री.सी.एस.भोर व श्री.एच.जे.शिंदे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ५ .१०.२००९